# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०५/०८/२०२४ (सोमवार) दुपार**

---

## आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीतांना कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. वेलतूर :– फिर्यादी नामे– श्री लवा वसंता सलोटे, वय ४२ वर्ष रा. भुयार यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. वेलतूर येथे अप. क्र. ४४/२२ कलम ४९८(अ), ३०६, ३४ भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयात फिर्यादीची मृतक मुलगी व आरोपी हे पती पत्नी असुन फिर्यादीची मृतक मुलगी नामे– सौ. सपना शेषराव उरकुडे वय २२ वर्ष रा. देवळी कला हिचे १० महिण्यापुर्वी आरोपी नामे– शेषराव दादाजी उरकुडे वय ४२ वर्ष याचे सोबत लग्न झाले होते. आरोपी हा लग्ना पासुन मृतक पत्नी सोबत चांगला वागत नव्हता व दोघांमध्ये नेहमी झगडे भांडन होत असल्याने दिनांक २९/०३/२०२२ चे १४/०० वा. ते १४/३० वा. आरोपी क्र १) शेषराव दादाजी उरकुडे वय ४२ वर्ष २) माधव दादाजी उरकुडे वय २८ वर्ष दोन्ही रा. देवळी कला यांनी मृतक हिला मारहान केले असता आरोपीच्या शारिरीक व मानसीक त्रास देण्याचा कारणावरून मृतकने विहीरीत उडी घेवुन आत्महत्या केली. आरोपीने मृतक हिस आत्महत्येस प्रवृत्त केल्याने मृतकने आत्महत्या केली.

सदर प्रकरणाचे तपास सपोनि डोर्लीकर पो.स्टे. वेलतुर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. एडिजे –२ पवार मॅडम कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक ०५/०८/२०२४ रोजी मा. एडिजे –२ पवार मॅडम यांनी वरील दोन्ही आरोपीस कलम ३०६ भादंवी मध्ये ३ वर्ष सश्राम कारावास व प्रत्येकी २०००/– रू. दंड, दंड न भरल्यास २ महीने साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री डगोरीया साा. यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोअं. अमर श्रावणकर पोस्टे वेलतूर यांनी मदत केली आहे.

## अवैध दारूची तस्करी करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

दिनांक ०४/०८/२०२४ रोजी पोस्टे मौदा येथील स्टाफ पोस्टे परीसरात पेट्रोलींग करीत असता मिळालेल्या गोपनीय माहिती नुसार मौजा माथनी शिवारातील रंगला पंजाब धाबा येथे आरोपी नामे– जागीरसिंग चन्ननसिंग संधू वय ७२ वर्ष रा. सुशिला सोसायटी,वित्तुबाबा नगर, प्लॉट नं ८१ गुरूद्वारा जवळ उप्पलवाडी नागपूर हल्ली मु. रंगला पंजाब ढाबा माथनी हा अवैद्यरीत्या विनापरवाना आपले ताब्यात देशी दारूने भरलेली १८० मिली च्या एकुण ४५ निपा किंमती ३१५०/–रू. मुद्देमाल बाळगताना मिळुन आल्याने जप्त करून आरोपीविरूद्ध पोस्टे मौदा येथे कलम ६५ (ई) मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे मौदा येथील ठाणेदार पोनि सतिशसिंग राजपूत, पोउपनि महेश बोथले व इतर स्टाफ यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर